५४३ 7

२०३

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/भोसरी/९३६० /२०१७
दिनांक : २१/११/२०१७

## **"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल झालेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने (मिळकतवर्णन) तहसिलदार सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी स.नं.५०० पैकी, सि.स.नं.१९६६, भोसरी, कासारवाडी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. तहसिलदार सक्षम प्राधिकारी, पुणे यांनी दि.०२/०६/२०१७ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण १३१ झोपडीधारकांपैकी १०७ निवासी पात्र ठरलेले आहेत.

सदर योजना क्षेत्राचा सक्षम प्राधिकारी तथा सहा. आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांचेकडून दि.०३/०४/२०१७ रोजी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल प्राप्त झालेला आहे. हे झोपडपट्टी

पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदर आदेश खाजगी मालकीच्या मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन प्रस्तावास मान्यता या स्वरुपाचा नसून सदर क्षेत्र केवळ पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याच्या स्वरुपाचा आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**<u>अनुसूची</u>**

| **जमिनीचा तपशील** | **क्षेत्र ( चौ. मी.)** | **चतु:सिमा** |
|---|---|---|
| स.नं.५०० पैकी, सि.स.नं.१९६६, भोसरी, कासारवाडी, पिंपरी चिंचवड, पिंपरी | २३८० चौ. मी. | **पुर्वेस -** रेल्वे |
| | | **पश्चिमेस -** स.नं.४९९पैकी |
| | | **उत्तरेस -** स.नं.५०० पैकी |
| | | **दक्षिणेस -** स.नं.४९९ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक -